# प्रकरण २

## प्रकरण २

# खटाव तालुका : एक दृष्टीक्षेप

या प्रकरणात खटाव तालुक्यातील भौगोलिक, ऐतिहासिक, राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा आढावा थोडक्यात घेण्याचा प्रयत्न केला आहे. कारण कोणत्याही विषयाचा अभ्यास करताना परिसर आणि वस्तूस्थितीची जाणीव असणे आवश्यक असते. त्यामुळे सर्वसाधारणपणे एकंदरीत खटाव तालुक्याचे स्वरूप वाचकांच्या लक्षात येते आणि ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमीची माहिती नसल्यास या ग्रामीण भागाचे अध्ययन अपूर्ण ठरते. या प्रकरणात त्या दिशेने विचार केलेला आहे.

खटाव तालुका हा सातारा जिल्हयाच्या पूर्व भागात येतो. सन १९९१ च्या जनगणनेनुसार खटाव तालुक्यात १३७ मुलकी गावे आहेत. खटाव तालक्याची लोकसंख्या १९९०-९१ साली २,०२,७०१ एवढी होती. यामध्ये पुरूष ९६,१८६ व स्त्रिया १,०६,५१५१ होते. १९९४-९५ साली खटाव तालुक्याची लोकसंख्या २,३३,१११ इतकी होती. त्यामध्ये पुरूष व स्त्रियांची संख्या अनुक्रमे १,१२,५३५ व १,२०,५७६ होती. १९९६-९७ साली खटाव तालुक्याची लोकसंख्या २,३४,१८२ एवढी होती. त्यामध्ये एकूण पुरूष व स्त्रिया अनुक्रमे १,१३,४४४ व १,२०,७३८ एवढे होते.[१]

### भौगोलिक पार्श्वभूमी

खटाव तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १३१८.६ चौरस किलोमीटर आहे. जमिन हलक्या व मध्यम प्रतीची असून पावसाचे सरासरी प्रमाण १० ते १६ इंच इतके आहे. तथापि सदर पावसाचे प्रमाण तालुक्याच्या पूर्व भागात याहूनही कमी आहे. खटाव तालुक्यातून येरळम ही मुख्य नदी वाहते आहे.[२]

खटाव तालुक्यातील लोकांच्या आरोग्यविषयक सुविधांचे दृष्टीने तालुक्यात ७ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३४ उपकेंद्रे आहेत. वडूज कलेढोण येथे ग्रामीण रूग्णालयांची सोय केलेली आहे. जनावरांना औषधोपचार करण्याच्यादृष्टीने ७ जनावरांचे दवाखाने व ९ पशुवैद्यकिय मदत केंद्रे आहेत. शैक्षणिक सुविधांच्यादृष्टीने खटाव तालुक्यात २१३ प्राथमिक शाळा, ४४ माध्यमिक शाळा व ८ उच्च माध्यमिक शाळा आहेत. २४३ अंगणवाडया आहेत. खटाव तालुक्यात १२९ ग्रामपंचायतीमार्फत गाव पातळीवर विविध योजना राबविण्यात येतात.[३]

खटाव तालुका हा सातारा जिल्हयातील अवर्षणग्रस्त कायमस्वरूपी दुष्काळी अवस्थेतील व आर्थिकदृष्टया दुबळा असा आहे. खटाव तालुक्याचा वैचारिक वारसा थोर असल्याने व ऐतिहासिक वारसा लोकोत्तर असल्याने आर्थिकदृष्टया दुबळया तालुक्याचे मन मात्र सुसंस्कृत व सामर्थ्यवान राहिलेले आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**

पूर्वीच्या काळापासून विचार केला तर खटाव तालुक्यातील जनमाणसावर शिवकालापासूनच म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून राष्ट्रीय विचारांचा प्रभाव पडलेला आहे असे दिसून येते. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री. शिवप्रभू म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा प्रभाव खटाव तालुक्यातील सामान्य माणसावर पडलेला दिसून येतो. विजापूरकरांच्या जाचात राहूनही मोगलशाहीविरूध्द लढा दिलेला आहे. रामदास स्वामींचे परमशिष्य जयरामस्वामी हे याचे जिवंत उदाहरण आहे. (शिवाजी महाराजांच्या काळातील व्यक्ती)

खटाव तालुक्यातील जयराम स्वामींचे वडगांव येथे रामदास स्वामी यांचा मठ हा इतिहासाचा साक्षीदार आहे.[४]

इ. स. १८५७ मध्ये स्वातंत्र्ययुध्द झाले. राणी लक्ष्मीबाई यांना साथ देणारे तात्या टोपे यांच्या सैन्यात खटाव तालुक्यातील कळंबी गावचे रामोशी व त्यांचे साथीदार स्वातंत्र्यप्राप्तीसाठी निष्ठेने लढले व हुतात्मे झाले. थोर समाजसेवक महात्मा फुले यांची जन्मभूमी खटाव तालुक्यातील कडगुण हे गांव आहे.

१९४२ च्या देशव्यापी स्वातंत्र्य लढयाच्या तेजस्वी इतिहासातील मातृभूमीच्या स्वतंत्रतेसाठी सर्वस्वाचा होम करून प्राणांचे बलिदान करणाऱ्या खटाव तालुक्यातील महान हुतात्म्यांच्या व क्रांतिकारक देशभक्तांच्या अलौकिक समर्पणाची सोनेरी पाने पिढयानपिढया राष्ट्रवादाची राष्ट्रभक्तीची अखंड प्रेरणा देत आहेत. ऑगस्ट क्रांतिपर्वातील हुतात्म्यांची स्मरणगाथा व सामाजिक क्रांतिपर्वातील सुधारकांचे अग्रणी "महात्मा जोतिबा फुले" यांची कुलभूमी या तालुक्याचे उज्जल भविष्य घडविण्यासाठी सर्वांना मार्गदर्शक ठरली आहे.[५]

भारताच्या स्वातंत्र्य लढयाचा इतिहास हा तसा ताजाच आहे. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात सर्व देश पेटून उठला. महाराष्ट्र त्यात अग्रभागी होता. महाराष्ट्रातील सातारा जिल्हा त्यामध्ये आघाडीवर होता. १९४२ साली महात्मा गांधीनी 'चले जाव'चा नारा दिला. आणि सर्व देशच देशभक्तीने भारावून गेला. त्यातूनच स्फूर्ती घेवून शेकडो तरूण परशुराम घार्गे यांच्या नेतृत्वाखाली तहसिल कार्यालयावर तिरंगा फडकविण्याच्या इरादयाने वडूज कचेरीवर गेले. त्यावेळी झालेल्या गोळीबारात परशुराम घार्गे यांच्यासह ९ जण हुतात्मा झाले.

सातारा जिल्हयात प्रतिसरकार स्थापन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण, वसंतराव पाटील, नाना पाटील या कार्यकत्यांचे संरक्षण करताना औंधचे राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी भूमिगत राहून या कार्यकर्त्यांना सहाय्य केले. खटाव तालुकयातील सामान्य माणसापासून ते औंधचे त्यावेळचे द्रष्टे राजेसाहेब बाळासाहेब

पंतप्रतिनिधी यांना पाहिले की असे वाटते खटाव तालुक्यातील मातीमध्येच देशभक्तीचे बीज रोवले आहे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय परिस्थिती**

सन १९५७ ते १९८५ या कालखंडात खटाव तालुक्याच्या राजकीय रंगमंचावर आलटून पालटून केशवराव पाटील व चंद्रहार पाटील हे दोन राजकीय नेते होते.

केशवराव पाटील व चंद्रहार पाटील हे दोन्ही कार्यकर्ते स्वातंत्र्योत्तर काळात खटाव तालुक्याच्या राजकीय प्रभावात आले. या दोघांनीही आपली राजकीय कारकिर्द समाजवादी पक्षाच्या माध्यमातून सुरू केली. त्यावेळचे संयुक्त महाराष्ट्र समितीचे अध्वर्यू व प्रजासमाजवादी पक्षांचे अध्यक्ष जोशी यांच्या मदतीने केशवराव पाटील यांनी १९५७ साली विधानसभेची निवडणूक लढविली. १९५७ मध्ये हे दोन्ही कार्यकर्ते समाजवादी पक्षात एकत्र काम करीत होते. १९५७ मध्ये अखिल भारतीय काँग्रेस पक्षाने खटाव तालुक्याचे विधानसभेचे उमेदवार म्हणून हुतात्मा परशुराम घार्गे यांच्या पत्नी 'श्रीमती हिराबाई घार्गे' यांना उभे केले. त्यांचा पराभव समजावादी पक्षाचे उमेदवार केशवराव पाटील व चंद्रहार पाटील यांनी केला.

१९५७ मध्ये निवडून आलेल्या केशवराव पाटील यांचा १९६२ मध्ये पराभव झाला. यावेळी काँग्रेस पक्ष विजयी झाला. १९६२ नंतरच्या काळात चंद्रहार पाटील यांनी यशवंतराव चव्हाण यांच्याशी सल्लामसलत करून केशवराव पाटील यांना विरोध करून खटाव तालुक्याचे राजकारण स्वतःच्या ताब्यात घेण्याच्या उद्देशाने काँग्रेसमध्ये प्रवेश केला. खटाव तालुक्यातील सातारा जिल्हयाचे नेते किसन वीर यांच्याशी संगनमत करून काँग्रेसचे सरचिटणीसपद मिळविले.

१९६२ मध्ये शिवाजीराव पवार आमदार झाले. किसन वीरांचे मदतीने चंद्रहार पाटील खटाव पंचायम समितीचे एकमताने सभापती झाले. खटाव तालुक्यात काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून त्यांनी सभापती पद मिळविले. चंद्रहार पाटील यांनी पक्षांतर्गत गटबाजीच्या राजकारणाचा पाया घातला आणि तेव्हापासूनच केशवराव व चंद्रहार पाटील स्वतःला नेते समजून काँग्रेस पक्षाला विसरून स्वतःच्या गटाच्या कार्यकर्त्यांचे हितसंबंध जोपासण्याच्या स्पर्धेला लागले. यातूनच संघर्षाची, गटबाजीच्या राजकारणाची तीव्रता वाढली आणि खटाव तालुक्याच्या राजकारणात गटबाजी स्थिर झाली. सन १९६२ मध्ये निमसोडचे शिवाजीराव पवार हे आमदार होते. ते चंद्रहार पाटील यांच्यामुळे आमदार झाले.

सन १९६७ मध्ये चंद्रहार पाटील स्वतः आमदार झाले. त्यांच्या गटाचे जोती नाना पाटील सभापती झाले. संघ मार्केट कमिटी यांच्या कार्यकर्त्यांच्या ताब्यात होती. यशंवराव चव्हाण हे एक महान सर्वशक्तीमान असे नेतृत्व चंद्रहार पाटील यांच्या पाठीशी होते. महाराष्ट्र शासन व केंद्र शासन अशा सर्व बाजूंनी अनुकूल परिस्थती होती.

सन १९७२ च्या निवडणूकीत केशवराव पाटील यांना तिकिट देण्याचे नाकारले. यातून केशवराव पाटील हे बंडखोर उमेदवार म्हणून निवडणूकीस उभा राहिले. १९७२ च्या निवडणुकीच्या अगोदरच्या काळात चंद्रहार पाटील आमदार होते व जोतीनाना पाटील सभापती होते. परंतु काँग्रेस नेते चंद्रहार पाटील यांच्या आळशी प्रवृत्तीमुळे व पंचायत समितीच्या भ्रष्ट कारभारामुळे काँग्रेस पक्षातील जागृत जनतेने चंद्रहार पाटील यांना काँग्रेस पक्षाचे महत्व समजण्यासाठी त्यांना अडचणीत आणून धडा शिकविण्याचा संकल्प काँग्रेस पक्षातील जागृत जनतेने चंद्रहार पाटील यांना दाखवून दिला. या कालावधीत काँग्रेस पक्षाचे नेते यशवंतराव चव्हाण यांच्या सल्ल्याने शिक्षण संस्थांच्या रूपाने खाजगी संस्थान उभारण्याचे मात्र चंद्रहार पाटील विसरले

नाहीत. लाखो रूपयांचे महाराष्ट्र शासनाकडून अनुदान मिळूनही महाराष्ट्राचे भाग्यविधाता यशवंतराव चव्हाण यांचे 'खटाव कॉलेज' दिलेले नांव पुसून टाकले.

अशा प्रकारे चंद्रहार पाटील यांनी स्वतःच्या स्वार्थी प्रवृत्तीतून खटाव तालुक्याला सुखसोयीपासून वंचित ठेवले. याचा गंभीर परिणाम आजही खटाव तालुक्यातील राजकीय गटाला, जनतेला सोसावा लागत आहे. १९७२ मध्ये केशवराव पाटील हे आमदार झाले. समाजवादी पक्ष, काँग्रेस पक्ष, जनता पक्ष, पुन्हा काँग्रेस पक्ष असा अस्ताव्यस्त राजकीय प्रवास ज्यांनी केला त्याच दोन नेत्यांनी म्हणजे चंद्रहार पाटील व केशवराव पाटील यांनी १९५७ ते १९८५ या कालावधीत जवळजवळ ३१ वर्षे आपल्या स्वार्थासाठी राजकारण केल्याचे पाहावयास मिळते.[६]

स्वातंत्र्योत्तर काळात खटाव पंचायत समिती सभापती चंद्रहार पाटील, जोतीनाना पाटील, श्री. अरूणराव बागल, श्री. टी. बी. जाधव, डॉ. सुरेश जाधव, सौ. विजयाताई बागल, भाऊसो गुदगे, विद्यमान सभापती श्री. शिवाजीराव पवार या व्यक्ती काँग्रेसप्रणित पक्षाच्या व्यक्ती सत्तारूढ होत्या. राजकीयदृष्टया हा तालुका जागृत व संवेदनक्षम आहे. निष्क्रिय नेतृत्वास दूर करून क्रियाशील नेतृत्वास सत्ता देण्यात या तालुक्याचा संमजसपणा व विवेक दिसून येतो. सन १९७२ मध्ये विधानभा निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाचे बंडखोर अपक्ष उमेदवार म्हणून श्री. केशवराव पाटील निवडून आले. त्यांनी १९७२ ते १९८५ पर्यंत आमदार म्हणून प्रतिनिधीत्व केले. अपक्ष उमेदवारीतून जरी आमदार म्हणून ते निवडून आले असले तरी ते नंतरच्या काळात काँग्रेस पक्षाच्या प्रवाहात सामील झाले होते.[७]

**प्रदीर्घ राजकीय अनुभवातून निर्माण झालेले परिपक्व नेतृत्व**

१९६२ पासून गाव, तालुका व जिल्हा स्तरापर्यंत गुदगे यांना लाभलेल्या लोकसेवेच्या विविध पदांच्या माध्यमातून जनतेशी समरस होऊन तालुक्यातील

जनतेच्या विविध प्रश्नांची यशस्वी सोडवणूक करण्यासाठी सतत धडपडणाऱ्या एका सामान्य सच्च्या कार्यकर्त्यास १९८५ पासून नेतृत्व बहाल करून तालुक्यातील सूज्ञ व जागृत जनतेने त्यांच्या कार्यक्षमतेवर कर्तृत्वशील जणू शिक्कामोर्तब केलेला आहे. भाऊसाहेबांची निर्धारपूर्वक केलेली निवड हा जनतेचा ऐतिहासिक निर्णय तालुक्याच्या जडणघडणीच्या प्रवासात एका नव्या विकासपर्वाला प्रारंभ करणारा सुवर्णक्षण ठरला.[८]

१९७२ च्या भीषण नैसर्गिक दुष्काळाच्या आपत्तीस तोंड देण्यासाठी तत्कालिन पंचायत समितीचे सभापती भाऊसो गुदगे यांनी तालुक्यातील हवालदिल जनतेस रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून पाझर तलाव, रस्ते, नालाबंडिग इत्यादी उत्पादक कामे देऊन जो दिलासा दिला ते भाऊसो गुदगे यांचे अफाट कार्य आजही लोकांच्या स्मरणात आहे. या दूरदृष्टीच्या नेत्यांनी तालुक्यात जलसंधारणाचे कार्य प्रचंड मोठया प्रमाणात उभारले आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्याच्यादृष्टीने त्या काळात केलेली कामे पाणी उपलब्धतेच्यादृष्टीने उपयुक्त ठरलेली आहेत. त्यांच्या कामाचा आवाका खरोखरच अचंबित करणारा असा आहे.[९]

१५ वर्षाच्या कालावधीत ग्रामविकासाच्या दृष्टीकोनातून केलेल्या विविध प्रकारच्या अगणित छोटया मोठया कामांतून नियोजनबध्द कार्यशैलीतून पायाभूत सुविधातून भाऊसाहेबांचे गतिमान क्रियाशिल नेतृत्व जनतेच्या आदरास व विश्वासास पात्र ठरले आहे. हीच गुदगे यांच्या कार्यकर्तृत्वाची पोचपावती आहे.[१०]

**वचनपूर्तीचे राजकारण**

राजकीय आवर्तनांच्या, राजकीय घडामोडींच्या व प्रत्येक काळानुसार बदलणाऱ्या राजकीय परिस्थितीत खटाव तालुक्याने विवेकबुध्दी जागृत ठेवून जाणीवपूर्वक दिलेल्या सत्तासंबंधीचे भाऊसाहेबांनी सामाजिक बांधिलकीच्या नात्याने व परतफेडीच्या कृतज्ञतेच्या भावनेने सोने केले आहे. विकास कार्याच्या रूपाने

जनतेच्या आशा आकांक्षा व विश्वास त्यांनी सार्थ ठरविण्याचा निष्ठापूर्वक प्रामाणिक प्रयत्न केला आहे. "जे होईल ते सांगणार आहे आणि जे सांगणार आहे तेच करणार." अशी भाऊसो गुदगे यांची वस्तूनिष्ठ कार्यप्रणाली आहे. जनतेला दिलेल्या शब्दास जागणाऱ्या वचनपूर्तीच्या राजकारणाचा नवा पगडा त्यांनी सुरू केला. तालुक्यातील राजकारणाला विधायक समाजकारणी विकासाभिमुख दिशा देवून लोकसेवेचे हितावह वळण त्यांनी दिले.

**विकासाची संकल्पना**

विविध समाजपयोगी कामातून मिळणारे समाधान हा विकास संकल्पनेचा सोपा अर्थ होय. विकासाची संकल्पना ही स्थलकाल परिस्थिती सापेक्ष असते. म्हणूनच त्या अनुषंगाने कारकिर्दीचे मूल्यमापन करणे इष्ट ठरेल.

विकासाच्या प्रक्रियेत ग्रामीण नागरी जीवनातील मूलभूत सोयी सुविधांची उपलब्धता आणि दीर्घकालीन योजना याचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. ग्रामीण विकासात शेतीचे पाणी, पिण्याचे पाणी, रस्ते, शिक्षण, वीज, वाहतूक इत्यादी विविध कामांचा अंतर्भाव होतो.[११]

**स्वातंत्र्योत्तर काळातील आर्थिक परिस्थिती**

१९४७ ला भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर पाश्चिमात्य देशातील भांडवलशाही व सोविएत रशियातील साम्यवाद या दोन परस्परविरोधी प्रणालींचा पाठपुरावा न करता भारताने लोकशाही, समाजवाद, मिश्र अर्थव्यवस्था व नियोजन हा मार्ग स्वीकारला.[१२]

खटाव तालुक्यातील स्वातंत्र्योत्तर काळातील आर्थिक परिस्थितीचा विचार करता, खटाव तालुक्यातील वर्ग आणि जाती यांचा परस्पर संबंध लक्षात घेता ज्या गावामध्ये जमिनदारी नष्ट करण्यात आली तेथील कुळांना मालकी हक्क प्राप्त झाले. बलुतेदार असणाऱ्या घटकांना १९६७-६८ साली कृषि क्षेत्रात हरितक्रांतीचा

फायदा झाला. शेती हा सर्वात मोठा उपक्रम आहे. १९९१ मध्ये या क्षेत्रात सुमारे ५० टक्के ग्रामीण लोकांना रोजगार मिळाला. आणि एकूण तालुक्याच्या उत्पन्नाच्या २४ टक्केपेक्षा थोडे अधिक उत्पन्न या क्षेत्रातून निर्माण झाले. शेती विकासासाठी शासनाने अनेक योजना तयार केल्या. यात प्रामुख्याने भू-सुधारणा, कुळकायदे, कृषिसंशोधन, सेंद्रिय व रासायनिक खते व सुधारीत बी-बियाणे, ग्रामीण विद्युतीकरण, ग्रामीण रस्ते बांधणी कार्यक्रम, कृषि पतपुरवठा यासारख्या विविध योजनाद्वारे शेती विकासाला हातभार लावला.[१३]

१९७२ ला दुष्काळ पडला. पूर्वीपासून खटाव तालुका हा दुष्काळी प्रदेश म्हणून ओळखला जात होता. स्वातंत्र्योत्तर काळात थोडीफार आर्थिक घडी बसली होती. १९७२ च्या दुष्काळाचा परिणाम एकंदर अर्थव्यवस्थेवर झाला. १९७२ पासून या तालुक्यामध्ये येरळवाडी, डांभेवाडी, येळीव, शिरसवडी, कानकात्रेवाडी येथे मध्यम पाटबंधारे प्रकल्प उभे राहिले. पारगाव, नेर व मायणी या गावातील तालव पूर्वीपासूनच आहेत. १९७२ च्या दुष्काळामध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत पाझर तलावांची व नालाबंडिंगची कामे झाली. पाझर तलाव, नालाबंडिंग, वनीकरण ही कामे भू-जलसंधारणाच्यादृष्टीने महत्वपूर्ण आहेत. त्यामुळे विहिर, बागायत जमिन, सिंचनक्षेत्रात वाढ झाली आहे. छोटया नाल्यावर, ओढयावर कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, भूमिगत बंधारे मोठया प्रमाणात बांधण्यात आले. जलसंधारणाच्या कामामुळे भूगर्भातील जलपातळी वाढण्यास मदत झाली. तालुक्याचे सिंचनक्षेत्रात वाढ झाल्यामुळे कृषि उत्पादनात वाढ झाली. कापूस, ऊस, घेवडा, बटाटा, शाळू या उत्पादनात ७० टक्के वाढ झाली. आणि यामुळे एकूण तालुक्याच्या उत्पन्नाच्या ३१ टक्के उत्पन्न एवढा आर्थिक लाभ झाला.[१४]

इ. स. १९७८-७९ पासून एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम सुरू झाला. ग्रामीण समाजातील दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या अल्पभूधारक, भूमिहिन,

शेतमजूर, पारंपारिक पध्दतीचा व्यवसाय करणारे कारागीर, किरकोळ व्यवसाय, धंदा करणारे व्यावसायिक कमी उत्पन्न गटतील समाजघटकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणणे. १९८० मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम व १९८३ मध्ये ग्रामीण भूमिहिन रोजगार कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच २८ एप्रिल १९८९ रोजी दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांनी ग्रामीण भागातील बेरोजगारांना त्यांच्या गावातच रोजगार उपलब्ध करून देणे आणि त्या कार्यात ग्रामपंचायतीस प्रत्यक्षरित्या सहभागी करून घेणे हे या योजनेचे उद्दिष्ट होते. तीन ते चार हजारापर्यंत लोकसंख्या असलेल्या खेडयांना प्रतिवर्षी ८० हजार ते १ लाख रूपयापर्यंत अर्थसहाय्य देण्यात येत आहे. या योजनेतून खटाव तालुक्याचा आर्थिक विकास सुधारला आहे.

जवाहर रोजगार योजनेअंतर्गत सामाजिक वनीकरण, छोटया पाणी पुरवठा योजना, मृदू संधारण, जलसंधारण, ग्रामीण पाणी पुरवठा, ग्रामीण रस्ते बांधणी, जमिन सुधारणा, अनुसूचित जाती जमातींच्या लोकांसाठी गृहबांधणी, शाळा, अंगणवाडया, बालवाडया यासाठी इमारती बांधणे, सिंचन विहिरी खोदणे इत्यादी कामे जवाहर रोजगार योजनेअंतर्गत खटाव तालुक्यात पार पाडण्यात आली.

कृषि उत्पन्न बाजार समितीमार्फत कृषि मालाची विक्री व्यवस्था करण्यात येते, अधिक दर मिळविण्यासाठी माल सुरक्षित ठेवावा लागतो. त्यासाठी पुसेगाव येथे शीतगृह बांधण्यात आलेली आहेत. मायणी, पुसेसावळी, पुसेगांव येथे उपबाजार सुरू केलेले आहेत.

अनुसूचित जाती जमातींच्या कल्याणासाठी विविध शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून खर्च करण्यात येतो. पंचायत समिती, जिल्हा परिषद व ग्रामपंचायत स्तरावरती समाजकल्याण विभागाद्वारे अनुदान खर्च करण्यात येते. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये १५ टक्के अनुदान मागासवर्गीयासाठी खर्च करण्यात येते. जिल्हा नियोजन विकास मंडळाच्या नियोजनातून मागासवर्गीयांसाठी ठराविक निधी राखून ठेवण्यात

येतो. त्यातून पिण्याचे पाणी, रस्ते, विद्युतीकरण, समाजमंदिरे इत्यादी उपयोगी कामे घेण्यात येतात.[१५]

**सध्याची आर्थिक परिस्थिती**

खटाव तालुका हा पर्जन्यछायेत मोडणारा कायमस्वरूपी अवर्षणग्रस्त तालुका आहे. येथील मुख्य व्यवसाय शेती असून लागवडीखालील ओलित क्षेत्र मर्यादित आहे. खटाव तालुक्याची भौगोलिक रचना व परिस्थिती पाहाता सर्व बाजूंनी डोंगराळ भाग आहे. येरळवाडी मध्यम प्रकल्प हा सर्वात मोठा जलाशय आहे. शेतीला पाणी पुरविण्याचा विचार केला तर खटाव तालुक्यामध्ये फार मोठा अनुशेष आहे. खटाव तालुक्यास बाहेरून म्हणजे कृष्णा खोऱ्यातून पाणी उचलून देण्याशिवाय अन्य उपाय नाही.

खटाव तालुक्यामध्ये रोजगार निर्मितीच्यादृष्टीने लघु औद्योगिक वसाहती व कारखानदारी नाही. सहकारी साखर कारखाने व सहकारी सूत गिरण्या या क्षेत्रात नाही. कारखाने उभे करण्याचे काही प्रयत्न असफल झाले.

अभिनव औद्योगिक वसाहत ही उंबर्डे येथे काही प्रमाणात कार्य करीत आहे. एक साखर कारख़ाना रायगांव येथे सध्या उभारण्यात आलेला आहे. सूतगिरण्या उभारण्यासाठी भागभांडवल जमा करण्यासाठी अन्य ठोस कार्य उभे राहिलेले नाही.

समाजाचा आर्थिक विकास साधण्यासाठी शेतीसाठी शाश्वतीचा पाणी पुरवठा हा महत्वाचा व अत्यंत जिव्हाळयाचा भावनात्मक प्रश्न आहे. पण शेती पाणी योजना साकार झालेली नाही. खटाव तालुक्याचा आर्थिक विकास न होण्यास कांही अंशी राजकीय व्यवस्थासुध्दा जबाबदार आहे.[१६]

१९८५ नंतरच्या काळात आमदार भाऊसाहेब गुदगे यांनी सर्व संभाव्य पाणी योजनांचा अभ्यास करून उरमोडीची योजना शासनास सुचविली व ती मंजूर झालेली

आहे. आज उरमोडी योजनेच्या कामास गती प्राप्त झालेली आहे. धरणग्रस्तांच्या विरोधामुळे या कामात व्यत्तय येत असला तरी प्रकल्पग्रस्तांचे आदर्श पुनर्वसन करण्याची सर्वातोपरी साहय करण्याची गुदगे यांची भूमिका आहे. तालुक्यात उरमोडीच्या कालवा खुदाईचे काम प्रगतीपथावर आहे. कृष्णा पाणी वाटप लवादाच्या निवाडयानुसार २००० सालापर्यंत कृष्णा खोऱ्यातील महाराष्ट्राच्या वाटयाला आलेले पाणी वापरावयाचे आहे. त्यादृष्टीने या योजनांना गती देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. उरमोडी बरोबरच जिहे, कठापूर उपसा जलसिंचन योजना व तारळी प्रकल्पाचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

विकासाच्या प्रक्रियेत ग्रामीण नागरी जीवनातील मूलभूत सोयी सुविधांची उपलब्धता आणि दीर्घकालीन योजना यांचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. ग्रामीण विकासात शेतीचे पाणी, पिण्याचे पाणी, रस्ते, शिक्षण, वीज, वाहतूक इत्यादी विविध कामांचा अंतर्भाव होतो.[१७]

**विकास कामांची सांख्यिकी माहिती (१९८५ ते १९९० अखेर)**

१. सार्वजनिक आरोग्यासाठी रू. २०,९५,७७४ खर्च करण्यात आले. सार्वजनिक आरोग्याचा विकास होण्यासाठी एवढा खर्च करण्यात आलेला आहे.

२. रोजगार हमी योजना

| | | |
|---|---|---|
| वन विभाग - २१ गावे | रू. | ३४,४७,३३७ |
| पाझर तलाव - ६ कामे | रू. | १०,७१,००० |
| लघु पाटबंधारे योजना (राज्यासाठी) ५० | रू. | ३९,८८,००० |
| ग्रामपातळी भूमिगत बंधारे - ६ कामे | रू. | २,४५,९०० |
| ग्रामीण भू. इजीएस - ११ कामे | रू. | १२,०७,००० |

इजीएस रस्ते - ५२ कामे रू. २,२५,५३,१४६

बी अँन्ड सी - १५ रस्ते रू. २८,५९,०००

३. वन विभाग - उद्यानर्निमितीसाठी रू. ४,३०,९१८

अवर्षण प्रवण क्षेत्र विकास वनीकरणासाठी रू. ७,३२,००२

४. लघु पाटबंधारे योजनाद्वारे (राज्यस्तर)३ लघुपाटबंधारे तलाव बांधण्यात आले. यासाठी रू. ४२,६३,००० खर्च करण्यात आले.

५. सार्वजनिक बांधकाम योजनांतर्गत ११ कामे करण्यात आली. त्यासाठी रू. २८,७९,००० खर्च करण्यात आले. विशेष दुरूस्ती योजनेमार्फत १९ कामे करण्यात आली. त्यावर रू. २८,३९,००० खर्च करण्यात आले.[१८]

सन १९८५ ते १९९० अखेर विद्युतीकरणावर खालीलप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

वाडयातील विदयुतीकरण यामध्ये १९ वाडयांचा समावेश आहे. यासाठी खटाव तालुक्यातील वीजमंडळावर १४,७६,३३० रूपये खर्च करण्यात आले. एच. बी. वस्त्यामध्ये १७ वस्त्यांचा समावेश आहे. यासाठी रू. ७४,९२,९७१ खर्च करण्यात आले.

अे. जी. ग्रुप १८०७ यासाठी रू. ७४,९२,९७१ खर्च करण्यात आले. स्ट्रीट लाईटसाठीच्या खर्चात १० गावाचा समावेश आहे. तसेच १९१ इंडस्ट्रियल कनेक्शन्ससाठी १९१ रू. ४,५३,४०० खर्च करण्यात आले. ५१९१ रहिवाशी कनेक्शनसाठी रू. १७,११,००० खर्च करण्यात आले.[१९]

मुख्यमंत्री टंचाई निवारण निधीद्वारे खटाव तालुक्यात खालीलप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

जिल्हा परिषद उपविभागद्वारे रू. ३२,९४,००० खर्च - १३ योजना

परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग रू. १,५८,४२,००० - ३१ योजना

टी.पी. डब्ल्यू. एस. द्वारे रू. ४,११,००० - ५ योजना

मुख्यमंत्री टंचाई निवारण योजनोद्वारे - रू. ५,८३,६०५ - ४ योजना

विंधन विहिरीसाठी - रू. ९४,९१,००० - ५२१ विंधन विहिरी

बंधारे एमआय - ६ व डीपीएपी - ११ - रू. १४,०६,०००

मृदूसंधारणासाठी २७०८ हेक्टर्स जमिनीवर रू. १,१२,७९,००० खर्च करण्यात आलेला आहे.

**पुर्नवसनविषयक कामे**

१. नढवळ गावाचे पुर्नवसन करण्यासाठी रू. १,२५,००० पहिल्या टप्प्यात व रू. ३,२५,००० दुसऱ्या टप्प्यात खर्च करण्यात आले.

२. फडतरवाडी (बुध) गावाचे पुर्नवसन करण्यासाठी रू. ४,९०,००० पहिल्या टप्प्यासाठी व रू. २,१३,००० दुसऱ्या टप्प्यासाठी खर्च करण्यात आले.

संजय गांधी निराधार व स्वावलंबन योजनेद्वारे खटाव तालुक्यात रू. २,६२,१०० खर्च करण्यात आलेला आहे. त्याचा २२७ निराधार व २८४ स्वावलंबन गटातील लाभार्थींना लाभ झालेला आहे.,

१९८५ ते १९९० या कालावधीमध्ये खटाव तालुका विकास योजनाअंतर्गत खटाव तालुक्यातील ग्रामीण भागात रू. १२,६५,७३,८५१-७१ इतका खर्च करण्यात आलेला आहे. ग्रामीण सुधारणा बऱ्याच प्रमाणात करण्यात आलेली आहे.[२०]

## केवळ आमदार फंडाच्या माध्यमातून केलेली विकासकामे (१९९० ते १९९९)

जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत खटाव तालुकयात सुमारे २० लाख रूपये आमदान निधीतून तालुका विकास कामासाठी देण्यात येतात. आमदार आपआपल्या विधानसभा मतदारसंघात लोकोपयोगी विकास कामे सुचवितात. त्यांच्या शिफारशींनी शासनाच्या यंत्रणेमार्फत कार्यवाही होत असते. स्थानिक विकास कार्यक्रम डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत आमदारांना स्वेच्छा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

**निधी विनिमयाचे प्रमाण**

१० टक्के मागावर्गीयांसाठी

५० टक्के प्राथमिक शाळा खोल्या बांधणी कार्यक्रम

४० टक्के लोकोपयोगी छोटया छोटया कामांसाठी

**१९९० ते १९९९ अखेरची कामे**

**१९९० सालची आर्थिक परिस्थिती व विकास कामाचा आराखडा**

५ समाजमंदिरे बांधण्यात आली. यासाठी रू. २,४१,९३८ इतका खर्च करण्यात आला. ५ कुपनलिका खोदण्यात आल्या. त्यासाठी रू. १७,४५५ इतका खर्च करण्यात आला. रस्ते विकास व रस्ते बांधणी यासाठी रू. १,८७,४६८ इतका खर्च करण्यात आला.

**१९९४ सालची आर्थिक परिस्थिती व विकास कामाचा आराखडा**

नेर विस्तारीत नळयोजना रू. ३८,४५६ इतका खर्च करण्यता आला. रू. ७९,६९६ इतका खर्च वाचनालयांवर करण्यात आला. रू. ७८,३५९ इतका खर्च सभागृह बांधकामावर करण्यात आला.

### १९९५ सालची आर्थिक परिस्थिती व विकास कामाचा आराखडा

पळशी येथे बांधण्यात आलेलया सभागृहासाठी रू. १,५०,१४४ इतका खर्च करण्यात आला. रू. ३,५१,४४४ इतका खर्च रस्ते डांबरीकरण, खडीकरण यावर करण्यात आला. तसेच रू. २,५७,३०१ इतका खर्च नळयोजनेवर करण्यात आला.[२१]

### १९९६ सालची आर्थिक परिस्थिती व विकास कामाचा आराखडा

सामाजिक सभागृह बांधकाम व इतर मोठया बांधकामासाठी रू. ३४,५०,१४४ इतका खर्च करण्यता आला. प्राथमिक शाळांच्या खोल्यांच्या बांधकामासाठी रू. ४२,८६,६०० एवढा खर्च करण्यात आला. त्याचबरोबर रू. ३,७०,८०८ एवढा खर्च कुपनलिकांच्या खुदाईवर करण्यात आला.[२२]

### १९९७ सालची आर्थिक परिस्थिती व विकास कामाचा आराखडा

सभागृह बांधकाम व इतर बांधकामे, रस्त्याचे खडीकरण, गावातील रस्ते यासाठी रू. ६,७६,३९४ खर्च करण्यात आले.

### १९९८ सालची आर्थिक परिस्थिती व विकास कामाचा आराखडा

तालीमगृहे बांधकामक, रस्ते विकास यावर रू. ४,८५,५८४ इतका खर्च करण्यात आला.

### १९९९ सालची आर्थिक परिस्थिती व विकास कामाचा आराखडा

रस्ते बांधणीवर रू. १,१०,०७०, रस्ते खडीकरण रू. २,९३,४५२, इतर रस्ते रू. १,३१,५८९, शाळा बांधकाम रू. ३,५८,२५०, इतर बांधकामे रू. ३,०३,८०९ व रू. ७१,९७८ इतका खर्च या वर्षात करण्यात आला.[२२]

टीप : १९९१, १९९२ व १९९३ या वर्षांतील खर्चाची आकडेवारी उपलब्ध नाही.

**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत वार्षिक कृती आराखडा (१९९०-९८)**

जागतिक बँक अर्थसहाय्य ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजना

गोरेगांव-वांगी वैयक्तिक योजना रू. ३७.२९ लाख मंजूर निविदा

वैयक्तिक शौचालये ३७० उद्दिष्ट रू. ६.२४ लाख अनुदान मंजूर

**मंजूर व प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजना**

१. डिस्कळ गावातील नळ पाणी पुरवठा करण्यासाठी अंदाजे रू. २.८३ लाख खर्च करण्यात आले.

२. लोणी (वाघवस्ती) गावातील नळ पाणी पुरवठा योजनेसाठी अंदाजे रू. ४.२५ लाख खर्च करण्यात आले.

३. पेडगाव गावातील नळ पाणी पुरवठा योजनेसाठी अंदाजे रू. १४.६७ लाख खर्च करण्यात आले.

४. नढवळ गावातील नळ पाणी पुरवठा योजनेसाठी अंदाजे रू. १४.६९ लाख खर्च करण्यात आले.

५. वर्धनगड गावातील पाणी पुरवठा योजनेअंतर्गत विहिर खुदाईसाठी अंदाजे रू. १.३६ लाख खर्च करण्यात आले.

६. विशेष घटक योजनाअंतर्गत अंभेरी गावातील पाणी पुरवठयासाठी अंदाजे रू. २.७१ लाख खर्च करण्यात आले.[२३]

**स्थानिक विकास कार्यक्रम योजनांमार्फत खटाव तालुक्यातील विकास योजना**

१. मायणी गावातील हरिजन वस्तीमध्ये पाणी पुरवठा करण्यासाठी अंदाजे रू. ३.९२ लाख खर्च करण्यात आले.

२. कुरोली गावातील हरिजन वस्तीमध्ये पाणी पुरवठयासाठी अंदाजे रू. १.९० लाख खर्च करण्यात आले.

३. एनकूळ गावातील खरमाने वस्तीमध्ये पाणी पुरवठा करण्यासाठी अंदाजे रू. ४.९५ लाख खर्च करण्यात आले.

४. डिस्कळ गावात उंच टाकी बांधण्यासाठी रू. ५.९० लाख खर्च करण्यात आले.[२४]

**१९८५ ते १९८९ सालातील आर्थिक स्थिती व विकास कामाचा आढावा**

१९८५ ते १९८९ या काळामध्ये रू. २३,०४,२८८ खर्च करण्यात आले. यामध्ये ३१ समाजमंदिरे, ८ व्यायामशाळा, ४ मनोरंजन केंद्रे, १ वाचनालय इमारत, २३ शाळांच्या खोल्या, ७ शाळांची दुरूस्ती, २२ नळ पाणी योजना व २३ रस्ते विकास कामांचा समावेश आहे.[२५]

**स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजरचना**

खटाव तालुका हा सातारा जिल्हयातील पूर्व भागात मोडतो. महाराष्ट्राइतकी वाशिंक विविधता या तालुक्यात दिसून येते. गौरवर्णीय, पितवर्णीय आणि कृष्णवर्णीय अशी तिन्ही वर्णियांची वैशिष्टये खटाव तालुक्यात कमी अधिक प्रमाणात आढळून येते. मराठी भाषा बोलणारे, मुस्लिम भाषा बोलणारे लोक खटाव तालुक्यात आहेत. यात मुस्लिमांची संख्या कमी आहे. विशेषतः मराठी भाषा बोलणाऱ्या समाजावर आर्य संस्कृतीचा प्रभाव पडलेला दिसून येतो. याचबरोबर काही चालिरितीचा द्राविडी प्रभावही पडलेला पाहण्यास मिळतो. खटाव तालुक्यातील समाजरचनेमध्ये धार्मिकतेचा प्रभाव अधिक पडलेला दिसून येतो. त्यामुळे या भागातील लोकांमध्ये धार्मिक वृत्तीची वैशिष्टये आढळून येतात.

स्वातंत्र्यपूर्व काळात या तालुक्यातील लोकसंख्येची धार्मिक संरचना बरीचशी धार्मिक संरचनेशी मिळतीजुळती होती. हिंदू बहुसंख्य असून त्यांची लोकसंख्या ५० टक्क्याहून अधिक होती. अल्पसंख्याकांमध्ये मुस्लिमांची संख्या सर्वाधिक म्हणजे तालुक्याच्या एकूण लोकसंख्येच्या ६ टक्केच्या आसपास होती. तर त्या खालोखाल म्हणजे एकूण लोकसंख्येच्या ४ टक्केच्या आसपास इतर धर्मियांची लोकसंख्या होती. हिंदू समाजात अनेक जाती, उपजाती यांची रेलचेल आहे.[२६]

भारतात इतरत्र होती तशी वर्णव्यवस्था या तालुक्यातही कालपरवापर्यंत अस्तित्वात होती. परंपरागत व्यवसायावर आधारित बारा बलुतेदारी पध्दती अस्तित्वात होती. ग्रामीण समाजाचे हे एक प्रमुख वैशिष्टय होते. खेडयातील जनता व शेतकरी वर्गास सेवा पुरवून त्यांच्याकडून कापड, धान्य व इतर जीवनावश्यक वस्तू मिळवावयाच्या अशी पध्दत असे.

महार, मांग, चांभर, कुंभार, लोहार, सुतार, परीट, न्हावी, जोशी, गुरव, मुलाणी, कोळी या पूर्वाश्रमींच्या बारा बलुतेदार जाती होत. खटाव तालुक्यात मराठा आणि कुणबी या जाती सर्व भागात कमी अधिक प्रमाणात दिसून येतात. ब्राम्हणांचे केंद्रीकरण मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक अशा मोठया शहरात झालेले असल्यामुळे फारसा ब्राम्हण समाज येथे उपलब्ध नाही. थोडया प्रमाणात ब्राम्हण समाज दिसून येतो. तुलनात्मकदृष्टया ब्राम्हणांची लोकसंख्या कमी असली तरी नोकरी, शिक्षण, आरोग्य व तांत्रिक क्षेत्रात त्यांचे प्रमाण बरेच आहे.

आजच्या एवढी समाज सुधारणा, प्रगती पूर्वीच्या काळी नव्हती. दळणवळणाची व वाहतुकीची साधने उपलब्ध नव्हती. दळणवळणाची साधने म्हणून बैलगाडीचा वापर करत असत. त्यामुळे गावचे सर्व व्यवहार संथपणे सुरू होते. गावागावामध्ये एकजूट, एकोपा होता. माणसे परस्परांच्या सुखदु:खात सहभागी व्हायची. एकमेकांना

अडीअडचणीच्यावेळी मदतीसाठी धावून जायची. सामाजिक वर्तनावर प्रथा पंरपरांचे बंधन होते. सामाजिक व धार्मिक बंधनामुळे समाजाचे वर्तन नियमित होते.

शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे गावाचा बाहय जगाशी फारसा संपर्क नसल्याने ग्रामीण अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण व स्वावलंबी होती. गावातल्या गरजा बहुतांशी गावातच पूर्ण व्हायच्या. वस्तूरूपाने कामाचा मोबदला दिला जात असे. चलनाचे फारसे व्यवहार होत नव्हते. गावामध्ये एकमुखी नेतृत्व होते. प्रमुख कारभाऱ्यांच्या वा कर्त्या माणसांच्या विचाराने गावगाडा सुरळीतपणे चालायचा. गावातील पुढाऱ्यांच्याविषयी भीतीयुक्त दरारा वाटायचा. त्यांचे निर्णय मानले जायचे. गावातील भांडणतंटे गावातील पाटील मंडळी मिटवित असत. त्यांच्या शब्दास किंमत दिली जायची. ग्रामपंचायतीच्या निवडणूका नाममात्र व्हायच्या. गावाच्या मध्यभागी वेस असावयाची. वेशीवर गावकरी गोळा होत असत. सदस्य निवडण्यापेक्षा नेमले जात असायचे. ते सर्वांना मान्य असत. राजकीय घडामोडीत सामान्य माणसे फारसे लक्ष घालत नव्हती. त्यापासून ती अलिप्त असत.

एकंदरीत स्वातंत्र्यपूर्व काळातील समाज रचनेचा अभ्यास केल्यास आपणास हे वैशिष्टय आढळून येते की, शेती हा प्रमुख व्यवसाय होता. त्यामुळे गावातील लोकांच्यामध्ये धार्मिकता ही तत्वप्रणाली प्रामुख्याने पाहण्यास मिळत होती. प्रत्येकाचा आदर केला जात होता. गावाचे वातावरण शांततेचे, सलोख्याचे व सामंजस्याचे असे होते.[२७]

शैक्षणिक विकासामुळे सर्व स्तरांतील लोक सुशिक्षित बनले व व्यक्तीस्वातंत्र्याचा संकोच करणाऱ्या बलुतेदारी पध्दतीचा त्यांनी त्याग केला. जातीभेद व अस्पृश्यता नष्ट होऊ लागली व समता, बंधुता या तत्वांना प्रतिष्ठा लाभली. परिणामतः जाती व्यवस्थेशी निगडीत अशी बलुतेदारी पध्दती ऱ्हासाकडे वाटचाल करू लागली.[२८]

**स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक परिस्थिती**

स्वातंत्र्योत्तर काळातील समाज व्यवस्थेत बदल घडून आले. औद्योगिक क्रांती घडून आली. खटाव तालुक्याचा विचार करता हया तालुक्यात फार मोठया प्रमाणात औद्योगिक विकास झाला नाही. त्यामुळे खेडयामध्ये मुख्यतः शेती व्यवसाय असल्याने मराठा, कुणबी हा वर्ग मोठया प्रमाणात शेती व्यवसाय करत असे. परंतु खटाव तालुका हा दुष्काळी भागात मोडणारा असल्यामुळे शेती व्यवसायात उदरनिर्वाह फारसा होत नसे. तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील समाजरचना फारशी सुधारलेली नव्हती. तालुक्यात अजूनही थोडयाफार प्रमाणात बलुतेदारीची पध्दत अस्तित्वात आहे. हे बारा बलुतेदार शेतकऱ्यांसाठी जशी कामे करतात तशी ते ती एकमेकांसाठीही करतात. या बलुतेदारापैकी काही शेती हा व्यवसायही करतात. काही ठिकाणी बलुत्याचे उत्पन्न महत्वाचे व शेतीचे उत्पन्न दुय्यम अशी परिस्थिती आहे.[२९] तर काही ठिकाणी शेतीचे उत्पन्न महत्वाचे व बलुत्याचे उत्पन्न दुय्यम अशी परिस्थिती आहे.

आजच्या गतिमान आर्थिक व सामाजिक जीवनात बलुतेदारी पध्दती झपाटयाने मागे पडू लागली आहे. महात्मा जोतिबा फुले यांची कर्मभूमी असलेला हा खटाव तालुका आहे. महर्षि वि. रा. शिंदे, महात्मा फुले, राजर्षि शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी आदी समाजसेवकांच्या कार्याचा परिणाम होऊन आज अस्पृश्यता नाहीशी होत चालली असून जन्मानुसार व्यवसाय ही कल्पनाही लोप पावत आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे व शहरीकरणामुळे तसेच वेगवेगळे व्यवसाय करण्याच्या प्रवृत्तीमुळे ग्रामीण महाराष्ट्रातील बलुतेदारी पध्दती ऱ्हास पावू लागली आहे.

कायदयाने सर्वांना समानता दिली व कायदयासमोर सर्व समान मानले जावू लागले. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचारास चालना मिळाली. वस्तुविनिमयाची पध्दती नष्ट होवून पैशाचे व्यवहारातील महत्व वाढले. औद्योगिक विकासामुळे औद्योगिक

क्षेत्रात मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध झाला व ग्रामीण भागातील जनता बहुसंख्येने या नव्या रोजगाराकडे आकर्षिली गेली. दळणवळणाच्या वाढत्या सुविधांमुळे खेडे व शहर यांच्यातील अंतर कमी झाले. खेडयातील आर्थिकदृष्टया दुर्बल असलेले लोक रोजगारासाठी शहराकडे जावू लागले. कुटुंबसंस्था, धर्मसंस्था यामध्येही बदल झाले. शैक्षणिक बदलामुळे समाजातील स्त्रीवर्ग बदलला गेला. औद्योगिक, राजकीय, सामाजिक संस्थांचा उदय मोठया प्रमाणात झालेला आहे.

सामाजिक परिस्थितीत बदल घडून येण्यास १९५५ चा अस्पृश्यता निवारण कायदा संमत केला गेला. या कायदयाचा प्रभाव सामाजिक परिस्थितीवर पडला गेला. यातूनच सामाजिक उन्नती मोठया प्रमाणात झाली.

भारतीय राज्यघटनेच्या सतराव्या कलमान्वये अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविण्यात आला. त्यासंबंधी तपशिलवार कायदा करण्याचा अधिकार भारतीय संसदेला दिला आहे. त्यानुसार संसदेने १९५५ मध्ये अस्पृश्यता निवारणासंबंधीचा कायदा संमत केला.[३०] संसदेच्या या कायदयान्वये व्यक्तिगत जीवनात अगर सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास प्रतिबंध करण्यात आला. सार्वजनिक ठिकाणी प्रवेश करण्यास आणि अशा ठिकाणांचा वापर करण्यास प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र व्यवसायाची निवड करण्याचे स्वातंत्र्य, मंदिर, पूजास्थाने या ठिकाणी प्रवेश करण्याचे स्वातंत्र्य, कोणत्याही ठिकाणी जमिन किंवा घर खरेदी करण्याचे स्वातंत्र्य, धार्मिक संस्थांचा समानतेने लाभ घेण्याचे स्वातंत्र्य यासारख्या काही तरतूदी या कायदयात करण्यात आलेल्या आहेत. तसेच या कायदयातील तरतूदींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस शासन करण्याची व्यवस्थाही करण्यात आलेली आहे.[३१]

अनुसूचित जातींच्या लोकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा व्हावी या उद्देशाने सरकारने अनेक कल्याणकारी योजना हाती घेतल्या आहेत. अनूसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि अन्य प्रकारची मदत देण्याची व्यवस्था करण्यात

आली आहे. त्यांच्यासाठी वसतिगृहे स्थापन करण्यात आली आहेत. शैक्षणिक संस्थात व विविध प्रकारच्या अभ्यासक्रमांत त्यांच्यासाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत.[३२]

खटाव तालुक्यात सामाजिक विकास होण्याच्यादृष्टीने पंचवार्षिक योजनांतर्गत अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी वेगळी आर्थिक तरतूद केलेली असते. उदा. अनुसूचित जातीच्या लोकांसाठी घरे बांधणे, त्यांना निरनिराळे व्यवसाय सुरू करण्यास अर्थसहाय्य करणे, शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे, अस्पृश्यता निवारण्याचे कार्य करणाऱ्या सार्वजनिक संस्थांना आर्थिक व अन्य स्वरूपाची मदत करणे इ. गोष्टींचा अंतर्भाव या कार्यक्रमात करण्यात आला आहे.[३३]

**आधुनिक काळातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा**

खटाव तालुक्यातील स्त्री एकोणिसाव्या शतकापर्यंत एखादया गुलामासारखे जीवन जगत होती. कुटुंबातही तिला दुय्यम लेखले जाई. या स्थितीत बदल घडून येण्यास खूपच कालावधी जावा लागला. तथापी या बदलाची सुरूवात एकोणिसाव्या शतकात झाली असे म्हणता येईल. त्याची काही महत्वाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१. भारतात झालेली इंग्रजी सत्तेची स्थापना - याचा फार मोठा प्रभाव स्त्री सुधारणेस पूरक असा ठरला. इंग्रजी सत्तेच्या स्थापनेमुळे येथे इंग्रजी शिक्षणाची सुरूवात झाली. इंग्रजी शिक्षणाने व्यक्तिस्वातंत्र्य, मूलभूत हक्क, स्त्री पुरूष समानता यासारख्या नव्या संकल्पना भारतात आणण्याचे कार्य केले. त्यातूनच स्त्रियांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन बदलला.

२. भारतीय स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी समाजसुधारकांनी केलेले प्रयत्नही विशेष महत्वपूर्ण होते. राजाराममोहन रॉय, महात्मा फुले, पंडित ईश्वरचंद्र

विद्यासागर यासारख्या समाजसुधारकांनी त्या काळात स्त्री सुधारणेसाठी अतिशय कष्ट घेतले. त्यामुळे समाजातील अनेक अनिष्ठ चालिरिती, रूढींना आळा बसला. स्त्रियांना शिक्षण घेता येऊ लागले. अशा प्रकारे त्यांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा झाला.

३. एकोणिसाव्या शतकात भारतीय समाजव्यवस्थेत काही महत्वपूर्ण बदल घडून आले. इंग्रजी सत्तेच्या काळात भारतात औद्योगिकीकरणाला सुरूवात झाली. या सर्व बदलांमुळे पारंपारिक समाजरचनेला काही प्रमाणात धक्के बसू लागले. स्त्रियांना अधिक स्वातंत्र्य व मोकळेपणा देण्याची तयारी येथील समाज दाखवू लागला.

४. भारतात इंग्रजी सत्तेची स्थापना झाली. त्यानंतर काही प्रमाणात लोकापयोगी व समाजोपयोगी कार्याचीही जबाबदारी स्वीकारली. म्हणून स्त्रियांची सामाजिक स्थिती सुधारण्यास मदत झाली आहे.

वरील सर्व कारणांमुळे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून भारतीय स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत हळूहळू सुधारणा होत गेल्याचे आपणास पहावयास मिळते. स्त्रिया शिक्षण घेऊन समाजजीवनाच्या विविध क्षेत्रात प्रवेश करू लागल्या. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाला जोर चढल्यावर अनेक स्त्रियांही त्यामध्ये सहभागी झाल्या.

विसाव्या शतकात स्त्री सुधारणा चळवळीला विशेष गती प्राप्त झाली. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली. राज्यघटनेने मूलभूत हक्कांच्या यादीत समानतेच्या हक्काचा अंतर्भाव केला. शासन व्यक्तिव्यक्तिमध्ये धर्म, जात, वंश, पंथ, लिंग, जन्मस्थान यांच्या आधारे कसलाही भेदभाव करणार नाही हे घटनेने स्पष्ट केले. त्यामुळे स्त्रियांना पुरूषांच्या

बरोबरीने सर्व अधिकार प्राप्त झाले. कामगार क्षेत्रातही समान कामासाठी स्त्री पुरु समान वेतन दिले पाहिजे याचे समर्थन केले गेले व समान वेतन कायदा संमत करण्यात आला. स्वातंत्र्यानंतर लोकशाहीचे व समानतेचे वारे मोठया प्रमाणावर वाहू लागले. साहजिकच स्त्रिया सार्वजनिक जीवनात अधिक संख्येने सहभागी होऊ लागल्या.

स्त्रियांना समाजात मानाचे स्थान मिळावे म्हणून शासकीय पातळीवरूनही बरेच प्रयत्न करण्यात आले. स्त्रियांच्या हक्कांचे रक्षण करण्याच्या उद्देशाने सरकारने अनेक महत्वपूर्ण कायदे संमत केले. हिंदू विवाह कायदा, हिंदू वारसा हक्क कायदा, अशा कायदयांनी स्त्रियांना अनेक हक्क मिळवून दिले. सरकारच्या निरनिराळया कल्याणकारी योजनात स्त्रियांच्या प्रश्नाकडे खास लक्ष पुरविले गेले.

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या शिक्षणातही बरीच प्रगती झाली. स्त्री शिक्षणाचा प्रचार, प्रसार मोठया प्रमाणावर झाला. शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांच्या संख्येत वाढ झाली. साहजिकच नोकरी, उद्योगधंदा, व्यवसाय इ. क्षेत्रे स्त्रियांना खुली झाली. त्याचबरोबर स्त्री आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनू लागली. आर्थिक स्वावलंबनामुळे तिच्या स्वातंत्र्यावर पडलेले अनेक निर्बंध दूर झाले. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्री प्रतिनिधीसाठी ३७ टक्के जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर आजची भारतीय स्त्री अनेक क्षेत्रांत पुरूषांच्या खादयांला खांदा लावून आपली कर्तबगारी दाखवित आहे.[३४]

स्वातंत्र्योत्तर काळात समाजाने स्त्रियांना थोडीफार समान संधी दिली. याचा परिणाम आज समाजपरिवर्तनात पाहण्यास मिळत आहे. खटाव तालुकयातील स्त्री राजकारणात सहभागी होवू लागल्या आहेत. उदा. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सौ. मंगल येवले या १९९९-२००० ला पंचायत समिती खटाव येथे सभापती म्हणून काम करतात. तसेच खटाव तालुक्यात स्त्रिया नोकरी करत आहेत. इतर क्षेत्रातही

स्त्रियांची संख्या मोठया प्रमाणात पाहण्यास मिळते. महिला मंडळे, सामाजिक क्षेत्र यांच्याद्वारे स्त्री जागृतीचे काम सुरू आहे. खटाव तालुका हा दुष्काळी भाग असल्यामुळे येथील पुरूष वर्ग शहराकडे जावून कामधंदा करतो. त्यामुळे येथील ५० टक्के स्त्रिया शेती व्यवसायाव्यतिरिक्त इतर उद्योगधंदे करताना पाहण्यास मिळतात.[३५]

आधुनिक काळात याप्रमाणे स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावला असला तरी आपल्या समाजाने स्त्री पुरूष समानतेच्या तत्वाला पूर्णपणे मान्यता दिली आहे असे अदयापही म्हणता येत नाही. आजदेखील स्त्रियांच्या बाबतीत पक्षपात केला जातो ही वस्तूस्थिती आहे. स्त्रिया नोकरी करू लागल्या असल्या तरी नोकरी करणाऱ्या या स्त्रियांनाही अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. नोकरीच्या बाबतीत भेदभाव केला जातो. स्त्रियांना नोकरी बरोबर आपला संसार, मुलबाळे याकडेही लक्ष दयावे लागते. त्यामुळे ती 'करियर' म्हणून नोकरीकडे पाहू शकत नाही. नोकरीधंदयात आपले स्वतंत्र कर्तृत्व दाखविण्याचा अवसर तिला मिळू शकत नाही. सध्याच्या महागाईच्या काळात संसार चालविण्याची जबाबदारी एकटा पुरूष पेलू शकत नाही. म्हणून केवळ गरजेपोटी तिला नोकरीकडे वळावे लागते. कुटुंबात आर्थिक व्यवहार आजही पुरूष पाहत असतात.[३६]

ग्रामीण समाजातील स्त्रियांची अवस्था तर यापेक्षाही वाईट आहे. ग्रामीण समाजात अदयापही शिक्षणाचा पुरेसा प्रसार झालेला नाही. स्त्री शिक्षणाच्या बाबतीत तर ग्रामीण समाज अधिकच उदासिन आहे. त्यामुळे निरक्षर स्त्रियांची संख्या प्रचंड म्हणण्या इतपत आहे. स्त्री स्वातंत्र्याच्या बाबतीत ग्रामीण समाजाचा दृष्टीकोन पुरेसा उदारतेचा नाही. तेथे आजदेखील स्त्रियांच्यावर अनेक सामाजिक निर्बंध आहेत. स्त्रियांच्या हक्कांचे रक्षण कागदावरच राहते. हुंडयासाठी तरूणींचा बळी घेतल्याची अनेक उदाहरणे आपल्या आसपास सतत घडत असल्याचे आजही अनुभवाला येते.

कष्टकरी वर्गातील ग्रामीण स्त्री अजूनही पंरपरांच्या जोखडातून पूर्णपणे बाहेर पडलेली नाही.

थोडक्यात खटाव तालुक्यातील स्त्रियांना समाजात मानाचे स्थान मिळू लागले हे खरे असले तरीही येथील सर्वच स्तरातील स्त्रियांची स्थिती सुधारली आहे असा निष्कर्ष यावरून काढता येणार नाही. स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजरचना, स्वातंत्र्योत्तर काळातील समाजरचना आणि सध्याची समाजरचना यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास असा निष्कर्ष (निघतो की) काढता येतो की, आधुनिक काळात स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावलेला दिसून येईल. जातीव्यवस्था बदलली आहे. शैक्षणिक सुविधा निर्माण झाल्याने सामाजिक दर्जा उंचावलेला आहे. स्त्री पुरूष समानतेचे युग सुरू झाले आहे, असे म्हणणे मात्र अजूनही धाडसाचेच ठरेल.[३७]

खटाव तालुक्यातील स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर तसेच सध्याची आर्थिक परिस्थती यांचा अभ्यास करता असे दिसून येते की, १९८५ च्या पूर्वी खटाव तालुक्याची आर्थिक परिस्थिती बेताची होती. त्यामध्ये सुधारणा अतिशय मंदगतीने होत होती. पाण्याचा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न फारसे झालेले नाहीत.

१९८५ नंतर आर्थिक परिस्थिती बदलेली आहे. पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. यातून आज मोठया प्रमाणावर पाणी प्रश्न सुटण्याचे मार्ग निघालेले आहेत.

खटाव तालुक्यातील राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा विचार करता राजकीय निष्ठा असलेला असा तालुका आहे. आर्थिक विकास मोठया प्रमाणात केलेला आहे. तालुक्याने प्रथम राजकीय विकास, द्वितीय आर्थिक विकास व तृतीय क्रमांकावर सामाजिक विकास केला आहे.

समाजातील माता व मुले यांचा अभ्यास करता असे दिसून येते की मागासलेल्या मुलांच्यामध्ये कुपोषण, शाळा गळतीचे प्रमाण अधिक आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी "एकात्मिक बालविकास सेवा" योजना राबविण्यात आलेली आहे. १९९० ते १९९३ पर्यंत फारशी मदत यासाठी मिळालेली नाही. १९९३ नंतर या योजनेचे महत्त्व समाजातील सर्वच स्तरातील स्त्रियांना समजले. आज या योजनेचा फार मोठया प्रमाणात समाजातील स्त्रियांना व ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना उपयोग होत आहे. मुलांचे कुपोषण कमी होत आहे.

या योजनेची विस्तृत माहिती आणि विश्लेषण पुढील प्रकरणामध्ये केलेले आहे.

संदर्भ

१. पंचायत समिती खटाव, वार्षिक प्रशासन अहवाल, १९९८-९९

२. आमदार ॲड गुदगे यांनी दिलेल्या राजकीय आढावा मासिकातून १५ वर्षाच्या विकासाची वाटचाल, पृष्ठ १

३. पंचायत समिती खटाव, वार्षिक प्रशासन अहवाल, १९९८-९९

४. जिल्हा परिषद सदस्य सुभाषराव देशमुख, आमदार ॲड. गुदगे यांच्या मुलाखती (दि. १८.१०.१९९९ व दि. १०.१०.१९९९)

५. श्री. पिटके दिगंबर, भारतमाता विद्यालय, मायणी (राष्ट्रवादी काँग्रेस प्रेमी) यांनी दिलेली मुलाखत दि. १०.१०.१९९९

६. आमदार ॲड. गुदगे व जिल्हा परिषद सदस्य सुभाषराव देशमुख यांनी दिलेल्या मुलाखती (दि. २५.११.१९९९ व दि. २८.१२.१९९९)

७. उक्त

८. आमदार ॲड भाऊसो गुदगे यांचा राजकीय कामाचा आढावा मासिक - १५ वर्षे विकासाची गतिमान वाटचाल, पृ. १०-१६

९. आमदार गुदगे यांनी मुलाखतीमधून दिलेली माहिती दि. १०.१०.१९९९

१०. श्री. पिटके दिगंबर, भारतमाता विद्यालय, मायणी (राष्ट्रवादी काँग्रेस प्रेमी) दिलेली मुलाखत दि. १०.१०.१९९९

११. आमदार ॲड भाऊसो गुदगे यांचा राजकीय कामाचा आढावा मासिक - १५ वर्षे बिकासाची गतिमान वाटचाल, पृ. ४-५

१२. के. सागर, सामान्य अध्ययन, सागर प्रकाशन, पुणे, पृ. ५५

१३. खटाव तालुका विकास परिषद, मुंबई मासिक, आमदार गुदगे, पृ. १२०

१४. उक्त

१५. उक्त

१६. श्री. पिटके दिगंबर, भारतमाता विद्यालय, मायणी (राष्ट्रवादी काँग्रेस प्रेमी) दिलेली मुलाखत दि. १०.१०.१९९९

१७. आमदार ॲड भाऊसो गुदगे यांचा राजकीय कामाचा आढावा मासिक - १५ वर्षे विकासाची गतिमान वाटचाल, पृ. १०-१६

१८. वार्षिक प्रशासन अहवाल, पंचायत समिती, खटाव, १९९० ते १९९८, पृ. ७-९

१९. उक्त

२०. आमदार ॲड भाऊसो गुदगे यांचा राजकीय कामाचा आढावा मासिक - १५ वर्षे विकासाची गतिमान वाटचाल, पृ. ११-१२

२१. उक्त

२२. वार्षिक प्रशासन अहवाल, पंचायत समिती, खटाव, १९९० ते १९९८

२३. उक्त

२४. आमदार गुदगे व देशमुख यांच्या मुलाखती दि. १०-१०-१९९९ व दि. १८-१०-१९९९

२५. उक्त

२६. खटाव तालुका मुंबई विकास परिषद मासिक, पृ. २०-२२

२७. समाजशास्त्र पुस्तक, लेखक के. सागर प्रकाशन, पुणे, पृ. १६०-१६५

२८. नागनाथ रा. स्वामी, समाजसेवक हुतात्मा परशुराम ज्युनियर कॉलेज, वडूज यांनी दिलेली मुलाखत दि. ७.२.२०००

२९. के. सागर, अस्सा हा महाराष्ट्र सागर प्रकाशन, पुणे, पृ. १४०

३०. उक्त

३१. उक्त

३२. त्रिंबक नारायण अत्रे, लेखक गावगाडा पुस्तक प्रकाशन, पुणे, पृ. ११२-११४

३३. जिल्हा परिषद सदस्य ॲड सुभाषराव देशमुख यांनी दिलेली मुलाखत दि. १५.१०.१९९९

३४. के. सागर, समाजशास्त्र पुस्तक, सागर प्रकाशन, पुणे, पृ. १५१-१९४

३५. पंचायत समिती सभापती खटाव सौ. मंगला येवले (१९९८-९९) यांनी दिलेली तोंडी मुलाखत दि. २०-५-२०००

३६. उक्त

३७. आमदार ॲड भाऊसो गुदगे यांची मुलाखत, दि.१८-२-१९९९

13803